# UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal : | Research Journey |
| ISSN Number : | |
| e-ISSN Number : | 23487143 |
| Source: | UNIV |
| Subject: | Marathi |
| Publisher: | Swatidhan International Publication |
| Country of Publication: | India |
| Broad Subject Category: | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

(https://www.ugc.ac.in/) FAQs (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
अ (https://www.ugc.ac.in/hindi/)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx)

# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for **r**

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| **View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=)** | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| **View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=)** | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

> e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)

> NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)

> RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)

> PG portal (https://pgportal.gov.in)

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce & Science College, Canada Corner, Nashik-422 002.

KVN Naik Arts, Commerce & Science College IQAC OFFICE

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 27 [B] : The GST and Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# वस्तु व सेवा कर (GST) आणि व्यापारावरील परिणाम

**प्रा.शरद पंढरीनाथ काकड**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
के.व्ही.एन. नाईक, कॉलेज, नाशिक

अर्थव्यवस्था कोणतीही असो तीच्यामध्ये करव्यवस्था मजबुत असणे हे अन्यन साधारण महत्वाचे असते. त्या अनुंशगाने भारतात २ जुलै २०१७ पासून वस्तु व सेवा कर लागू झाल्यामुळे भारताच्या कर व्यवस्थेच्या इतिहासात २०१७ हे वर्ष महत्त्वाचे ठरणारे आहे. योग्य कर धोरणे ही कोणत्याही देशाच्या मजबुत प्रशासन आणि शाश्वत विकासाचे निर्देशांक मानली जातात. यासाठी अगदी इतिहासकालीन दाखले देता येतील अकबर, मौर्य, गुप्त या सर्व राजांनी त्याच्या कार्यकाळात महसूल संकलणाची चोख यंत्रना राबविली होती. कर हे महसूल आणि प्रगतीचा श्रोत आहेच, शिवाय त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे व करदात्याप्रतीचे उत्तरदायित्वही वाढीस लागते.

### जागतिक पातळीवर वस्तु व सेवा कर (GST) :

जागतिक पातळीवर सर्वप्रथम मुल्यवर्धीत कर प्रणालीचे प्रतिपादन १९१८ मध्ये एफ.वान. सिमेस यांनी केले. त्यानंतर मोजक्याच देशांनी १९६० पर्यंत त्याचा अवलंब केला. फ्रॉन्स हा मुल्यवर्धीत कर प्रणालीचा मर्यादीत प्रमाणात वापर करणारा पहिला देश ठरला आहे व पूर्णपणे या प्रणालीचा वापर करणारा १९६० च्या दशकातील ब्राझील हा देश आहे. आज जगातील जवळजवळ १६० देशात ही करप्रणाली लागू केली गेली आहे. त्यामुळे युरोपातील जवळजवळ ५३ देश व त्यानंतर आफ्रीकेतील ४४ देशांचा क्रम लागतो. त्याचप्रमाणे या करप्रणालीचा वापर न करणारे देश देखिल आपणास जागतिक पातळीवर सांगता येतील जसे, सौदी अरेबीया, कुवेत, इराक, उत्तर-कोरीया, यू.ए.ई., यु.एस.ए. व मलेशिया या देशाचा समावेश करता येईल. चीन हा देश देखिल वस्तू व सेवा कर लागु करण्याच्या तयारीत आहे.

### भारतात वस्तु वसेवा कर (GST) :-

विजय केळकर समीतीने वस्तू व सेवा कराची संकल्पना सर्वप्रथम २००४ साली मांडली त्यानंतर २००६-०७ च्या अर्थसंकल्पात १ एप्रिल २०१० पासून वस्तू व सेवा कर लागू करण्याची घोषणा अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी केली होती. परंतु ते शक्य होवू न शकल्याने हा कर लागू करण्याची तारीख एकेक वर्षानी पुढे ढकलण्यात आली. दरम्यान तत्कालीन कॉंग्रेस सरकारने GST लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटना दुरुस्तीसाठी ११५ वे घटना दुरुस्ती विधेयक, २०११ संसदेत मांडले. परंतु कॉंग्रेस सरकार विसर्जीत झाल्यामुळे ते पुढे सरकू शकले नाही. व पुढे १९ डिसेंबर, २०१४ रोजी नवीन १२२ वे घटना दुरुस्ती विधेयक, २०१४ रोजी लोकसभेत मांडले गेले व ते ६ मे २०१५ रोजी लोकसभेत पारित करुन राज्यसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने त्यात काही बदल सुचवले जे लोकसभेने स्वीकारले. याचे कायद्यात रुपांतर करण्याकरीता आवश्यकतेपेक्षा जास्त राज्यांच्या विधीमंडळाने मान्यता दिली त्यानंतर मा. राष्ट्रपती यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजी संमती दिल्यानंतर हया कायद्यानुसार १ जुलै २०१७ पासून संपूर्ण भारतात GST लागू करण्यात आला.

### वस्तु व सेवा कराचे दर :-

GST मधील कराच्या दराबरोबरच सर्व महत्त्वाच्या विषयांवर निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार GST परिषदेला दिलेला आहे. त्यातील एक प्रमुख निर्णय म्हणजे एका गटातील सर्व वस्तुंवर ०%, ३%, ५%, १२%, १८% तसेच २८% यापैकी एका कराचा दर लागेल.

GST करप्रणालीत सर्वात मोठा फायदा लहान व्यापाऱ्यांना झाला आहे. कारण VAT प्रणालीअंतर्गत १० लाख रुपये ही उलाढालाची मर्यादा होती. तर GST मध्ये ती विशेष श्रेणीतील राज्ये सोडली तर बाकी राज्यात ही मर्यादा २० लाख रुपये केलेली आहे.

**GST अंतर्गत कराची संरचना खालील प्रमाणे सांगता येईल.**

**GST कर दर संरचना :**

| प्रकार | कराचा दर | |
|---|---|---|
| शुन्याधारीत | ०% | जीवनावश्यक वस्तू (अन्नधान्यासह) |
| निम्नदर | ५% | सर्वसाधारणपणे वापरण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा |
| दोन प्रमाण दर | १२%<br>१८% | ग्राहकोपयोगी वस्तू व सेवा (मोठया प्रमाणात समावेश) |
| उच्चतम दर | २८% | लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने व शितपेये |
| अतिरिक्त सेस | - | लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने, शीतपेये व इतर |

**GST चा व्यापारावरील परिणाम :-**

वस्तू व सेवा कराचा अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रांवर मोठया प्रमाणावर परिणाम झालेले दिसतात ते आपणास खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) शैक्षणिक व औषधीय सेवा सुविधा :-**

प्राथमिक शिक्षण व आरोग्यासंबंधी सेवा सुविधा GST च्या आखत्यारीतून बाहेर ठेवण्यात आल्या आहेत. म्हणजेच उपभोक्त्यांना वरील सेवा सुविधांवर खर्च करावा लागणार नाही. परंतू संबंधीत वस्तू व सेवा उत्पादन करणाऱ्या उत्पादन संस्थांकडून अधिक करभार ग्राहकांकडे हस्तांतरीत केला जाईल.

**२) तयार कपडे :-**

तयार कपडयांवरील पूर्वीच्या असलेल्या १८.१६% दरावरुन १२% पर्यंत GST अंतर्गत कमी करण्यात आल्याने तयार कपडे स्वस्त होतील व उपभोक्त्यांच्या कल्याणात भर पडेल.

**३) ऑटोमोबाईल क्षेत्र :-**

GST अंतर्गत ३५० cc इंजिन क्षमतेच्या अधिकची मोटार सायकल, खाजगी जेट विमान आणि महाग अलिशान बोटच्या खरेदीवर ३१% GST आकारण्यात आलेला आहे. त्यामुळे एकंदरीत मोटार सायकल, बोटी खरेदींचा चार्ज जास्त होईल. त्याचबरोबर सर्व कार, बस, ट्रक आणि मोटारसायकल बरोबर व्यक्तिगत विमान, लक्झरी बोटवर २८% GST आकारला जाईल.

**४) बांधकाम क्षेत्र :-**

बांधकाम क्षेत्रात मोठया प्रमाणात खर्च वाढणारा आहे. कारण सिमेंट वरील GST कर २८% पर्यंत वाढल्यामुळे त्याचप्रमाणे इंधन म्हणून वापरले जाणारे १५०० cc डिझेल कर वर २८% GST ३% उपकर लावल्याने या क्षेत्रावर देखिल बऱ्याच प्रमाणात परिणाम झालेला दिसून येईल.

**५) वाहतूक सेवा :-**

वस्तु व सेवा करामुळे कार, ट्रक, बस, मोटार सायकल खरेदीवर २८% GST लावल्यामुळे त्याचप्रमाणे इंधनांवर देखिल वरील प्रमाणे ३१% पर्यंत GST असल्याने वाहतूक सेवा देखिल महाग होतील.



Scanned by CamScanner

६) **हॉटेल सेवा :-**

जर उपभोक्ता एखाद्या हॉटेल मध्ये राहण्यासाठी गेला व तेथे जर त्याने रुम भाडे १००० रु. पेक्षा कमी दिले असेल तर त्यावर GST लावला जाणार नाही परंतु हॉटेल मधील त्याचा एकुण खर्च ५०००/- रुपया पेक्षा जास्त असेल तर त्यावर २८ % GST लावला जाईल.

७) **मोबाईल बिल :**

वस्तु व सेवा करामुळे मोबाईल बील व दुरंसचार सेवांचा भार वाढणारा आहे. कारण पुर्वी या सेवावरील १५% कर दरापेक्षा त्यात ३% अधिक कर वाढवुन १८% ऐवढा करण्यात आला आहे.

८) **दागिणे :**

GST मुळे सोन्यातील गुंतवणुक महाग होणार आहे कारण त्यावर GST दर ३ % व मजुरी दर ५% ऐवढा असणार आहे यापुर्वी सोन्यावरील कर दर २% होता आता तो २%वरुन ३% पर्यंत वाढविलेला आहे.

९) **तंबाखू उत्पादन :**

तंबाखु उत्पादनावर ७१ ते २०४% दराने उपकर लावण्यात येईल त्याच बरोबर खुशबुदार जर्दा वर १६०% दराने उपकर आकारण्यात येईल ब्रॅडेड गुटख्यावर ७२% उपकर राहील त्याचप्रमाणे पाईप आणि सिगारेट मध्ये भरण्यात येणाऱ्या तंबाखु मिश्रणावर २९०% दराने उपकर आकारण्यात येईल.

**संदर्भ**

१. योजना मासिक : ऑगस्ट २०१७
२. अर्थव्यवस्था व्दैमासिक : अंक २ ल, रत्नाई प्रकाशन
३. भारतीय अर्थव्यवस्था : भगीरथ प्रकाशन
४. भारतीय अर्थव्यवस्था : दीपस्तंभ
५. www.Jaagore.com
६. www.hind.bodhibooster.com



Scanned by CamScanner